महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ४७ वे | दिनांक : ०७/०२/२०२६ | वार : शनिवार

# आज १२ जिल्हा परिषदा, १२५ पंचायत समित्यांसाठी मतदान



**मुंबई :** राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उद्या (ता. ७) मतदान होत असून जिल्हा परिषदेच्या ७३१; तर आणि पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. एकूण ७ हजार ४३८ इतके उमेदवार निवडणूक रिंगणात असून सर्व मिळून एकूण २ कोटी ८ लाख २० हजार ७०२ इतकी मतदार संख्या आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेसाठी पुरेशा पोलिस बंदोबस्ताचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा १३ जानेवारी २०२६ रोजी केली होती. त्यानुसार ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार होते; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाल्यानंतर मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आला. त्यानुसार आता उद्या (ता. ७) सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. मतमोजणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल. त्यानंतर आचारसंहिता संपुष्टात येईल.

सर्व बारा जिल्हा परिषदांच्या एकूण ७३१ जागा असून, त्यातील ३६९ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी ८३, अनुसूचित जमातींसाठी २५ आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी १९१ जागा आरक्षित आहेत. जिल्हा परिषदांच्या या सर्व जागांसाठी एकूण २ हजार ६२४ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. सर्व १२५ पंचायत समित्या मिळून एकूण १ हजार ४६२ जागा असून, त्यातील ७३१ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी १६६, अनुसूचित जमातींसाठी ३८ आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३४२ जागा आरक्षित आहेत. पंचायत समित्यांच्या या सर्व जागांसाठी एकूण ४ हजार ८१४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठीच्या २५ हजार ४७१ मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेऊन पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ५१ हजार ५३७ कंट्रोल युनिट आणि १ लाख १० हजार ३२९ बॅलेट युनिटचा समावेश आहे. त्यासाठी सर्व सबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षणदेखील देण्यात आले आहे.

## छत्रपती संभाजीनगरच्या महापौरपदी भाजपचे समीर राजूरकर तर उपमहापौरपदी राजेंद्र जंजाळ




**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेत भाजप-शिवसेना युतीचे सत्तावाटप निश्चित झाले असून, भाजपकडून समीर राजूरकर हे महापौरपदी विराजमान होणार आहेत. दरम्यान, शिवसेनेकडून राजेंद्र जंजाळ यांना पुन्हा एकदा उपमहापौरपदाची संधी देण्यात आली आहे.

अतुल सावे म्हणाले की, राज्यात आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वामधील सरकार आहे. याच गोष्टीचा विचार करत मुख्यमंत्री फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वामध्ये शहराचा विकास करावा यादृष्टीने आम्ही भाजप-शिवसेना एकत्र काम करत आहे. संभाजीनगरच्या विकासासाठी आम्ही काम करत आहोत. दोन्ही पक्ष शहराच्या विकासासाठी कटीबद्ध आहोत. भाजपतर्फे महापौरपदासाठी समीर राजूरकर यांना संधी देण्यात आली आहे. त्यांना मनपामध्ये काम करण्याचा अनुभव आहे ते चांगले काम करू शकतील. तर उपमहापौर म्हणून शिवसेनेचे राजेंद्र जंजाळ यांना संधी देण्यात आली आहे. शिवसेना आमच्यासोबत केंद्रात आणि राज्यात सोबत सरकारमध्ये आहे. शिवसेना आमचा मित्रपक्ष आहे.

भाजपचे शहराध्यक्ष किशोर शितोळे म्हणाले की, तिकीट वाटपापासूल मी सांगत होतो की आम्ही मैत्री पूर्ण लढत आहोत. हिंदुत्त्वाच्या भूमिकेवर आम्ही एकत्र आलो आहोत. राज्यात अन् शहरात एकत्र काम केले पाहिजे, ही आमची भूमिका आहे. यात भाजपचा महापौर आणि शिवसेनेचा उहापौर होणार आहे. युती करणारच होतो. कारण विकासाची कामे करत असताना दोघांनी सोबत कामे केली तर शहर विकसित करू शकू. पाण्याच्या प्रश्नासाठी आम्ही काम करू आणि शहर चांगले करण्याासाठी आम्ही काम

शिवसेनेचे विलास पारकर म्हणाले की, महायुतीमध्ये भाजप आमचा मोठा भाऊ आहे तर शिवसेना छोटा भाऊ आहे हे आम्ही मान्य केले आहे. हिंदुत्व आणि विकासाचे राजकारण करण्याची आमची भूमिका आहे. मनपाचे निवडणूक ही कार्यकर्त्यांची होती. महायुतीमध्ये काही वाद नाही. मनपावर कायम भगवा राहणार.महानगरपालिकेच्या निवडणुकीत ५७ जागांसह स्पष्ट बहुमत मिळवल्यानंतर भारतीय जनता पक्षाने सत्तावाटपाची प्रक्रिया वेगाने सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर पक्षाने ओबीसी प्रवर्गातील निष्ठावंत कार्यकर्ते प्रा. गोविंद केंद्रे यांची गटनेतेपदी नियुक्ती केली आहे. करत राहू.

# साउथ अभिनेत्री अंजू कृष्णाला ड्रग्ज प्रकरणात अटक



**सा**उथ फिल्म इंडस्ट्रीतून ड्रग्जचे प्रकरण समोर आले आहे. अँटी-नार्कोटिक्स इंटेलिजन्स युनिट (ANIU) साउथच्या टीमने अभिनेत्री अंजू कृष्णा आणि असिस्टंट डायरेक्टर विन्सी निवेथा यांच्यासह एकूण ८ जणांना ड्रग्ज प्रकरणी अटक केली आहे.टीओआय सिटीच्या रिपोर्टनुसार, पोलिसांनी गुरुवारी रात्री उशिरा वलसरवक्कम परिसरात केलेल्या छापेमारीत टीमने मेथाम्फेटामाइन आणि गांजासह इतर अवैध पदार्थ जप्त केले. प्राथमिक तपासात पोलिसांना माहिती मिळाली होती की काही लोक अवैध ड्रग्जच्या खेपसह संशयास्पद हालचाली करत आहेत, त्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी आधी एक बनावट ग्राहक पाठवून सापळा रचला. जेव्हा संशयितांची कार वलसरवक्कमजवळ पोहोचली, तेव्हा पोलिसांनी ती थांबवली आणि तपासणी केली. तपासणीत सुमारे ६ ग्रॅम मेथाम्फेटामाइन, ७ ग्रॅम ओजी गांजा, १५ ग्रॅम गांजा, एक स्मोकिंग बॉन्ग, एक स्टॅम्प आणि ९ मोबाईल फोन जप्त करण्यात आले. पकडलेल्या सर्व लोकांना पोलिस कोठडीत घेऊन पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी पाठवण्यात आले आहे आणि त्यांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ फेब्रुवारी २०२६


## तिफण लोकवाद्ये विशेषांकाचे कन्नड येथे प्रकाशन



**कन्नड (प्रतिनिधी)** लोकसंस्कृतीच्या धाग्यांना जपत शब्द आणि सुरांचा संगम साधणाऱ्या 'तिफण' या त्रैमासिकाचा लोकवाद्ये विशेषांक कन्नड येथे उत्साहपूर्ण साहित्यिक वातावरणात प्रकाशित झाला. भाषा, संस्कृती व संशोधन परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सवात मराठीतील ख्यातनाम कवी, लेखक, गीतकार, पटकथालेखक व संवाद लेखक नारायण सुमंत यांच्या शुभहस्ते या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.हा सोहळा लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात पार पडला.कार्यक्रमाच्या प्रारंभी *'तिफण'*चे संपादक तथा संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी प्रास्ताविकातून विशेषांकाची भूमिका उलगडली. लोककलेचा वारसा जतन करण्यासाठी आणि लोप पावत चाललेल्या लोकवाद्यांच्या अभ्यासपूर्ण माहितीचे संकलन करण्यासाठी हा विशेषांक प्रकाशित केल्याचे त्यांनी सांगितले. कन्नड तालुक्यातील कवींना या विशेषांकात स्थान देऊन स्थानिक साहित्यिक शक्तींना व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचा त्यांनी विशेष उल्लेख केला. हा अंक अभ्यासक, संशोधक आणि लोकसंस्कृतीप्रेमींसाठी मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादन त्यांनी केले.या प्रकाशन सोहळ्याला व्यासपीठावर प्रसिद्ध कवी राजेंद्र दिघे, प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. अंबादास सगट, प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, महोत्सवाचे स्वागताध्यक्ष रामकृष्ण पवार, नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे तसेच तिफणचे संयोजक प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांची उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला साहित्यिक आणि सांस्कृतिक वैभव प्राप्त झाले.यावेळी डॉ. संजय गायकवाड, माधुरी चौधरी, ज्योती सोनवणे, अरुण थोरात, प्रविण दाभाडे, सुरेश औटे, संदीप वाकडे, केशरचंद राठोड, संदीप ढाकणे, रामेश्वर मोरे, जगन्नाथ जाधव, दत्ता मोरसकर आदी कवी, वाचक आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कवितेच्या आणि लोकसंस्कृतीच्या या संगमाने सभागृहात एक वेगळेच सांस्कृतिक ऊर्जाकेंद्र निर्माण झाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संदीप ढाकणे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन

तालुकाध्यक्ष कवी प्रविण दाभाडे यांनी मानले.लोकवाद्यांच्या नादातून संस्कृतीची स्मृती जपणारा हा विशेषांक आणि त्याचे कन्नड येथे झालेले प्रकाशन, साहित्य व लोकपरंपरेच्या जतनासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे.

## जे.इ.एस. महाविद्यालयात विद्यार्थी संसदेचे उद्घाटन




**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** "आपले विचार हीच आपली खरी ऊर्जा आहे. जर आपले विचार सशक्त आणि प्रगल्भ असतील, तर आयुष्यात कशाचीही भीती बाळगण्याचे कारण उरत नाही. महाविद्यालयीन वय हे व्यक्तिमत्व घडवण्याचे वय असून, विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रगल्भ करण्यावर भर द्यावा," असे प्रतिपादन गझलकार डॉ. राज रणधीर यांनी केले. येथील जेईएस महाविद्यालय जालना येथे 'युवा जल्लोष 'च्या कार्यक्रमांतर्गत, विद्यार्थी संसद'चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी बगडिया होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रणधीर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या प्रसिद्ध गझल रचना सादर करून त्यांनी संपूर्ण सभागृहाला मंत्रमुग्ध केले. त्यांच्या "हवे ते कर तुला पण मी तुला विसरायच्या आधी..." या ओळींना युवकांनी प्रतिसाद दिला.विद्यार्थी संसदेचा शपथविधीकार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि महाविद्यालय गीताने झाली. प्राचार्यांनी प्रास्ताविक केल्यानंतर नवनिर्वाचित विद्यार्थी संसद सचिव कु. संस्कृती संगम आणि इतर विद्यार्थी प्रतिनिधींना शपथ देण्यात आली. यावेळी संस्कृती संगम हिने संसदेचा वार्षिक अहवाल सादर केला.अध्यक्षीय समारोप करताना पुरुषोत्तमजी बगडिया म्हणाले की, महाविद्यालय हे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्वाचे स्थान आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयाने सातत्याने नवनवीन उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.मान्यवरांची उपस्थितीया सोहळ्याला संस्थेचे सचिव श्रीनिवास भक्कड, उपाध्यक्ष फुलचंदजी भक्कड, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते, उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड, प्रा. ज्ञानेश्वर धनवे, युवा जल्लोष प्रमुख डॉ. हेमंत वर्मा, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. मनोज महेर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाबासाहेब वाघ यांनी केले, तर प्रा. शिवानंद मुंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे! प्राचार्य डॉ.विश्वास कदम




**पाटोदा (प्रतिनिधी) :** 12, च्या सर्व विद्यार्थ्यांनी नियोजनपूर्वक अभ्यास करुन आत्मविश्वासाने बोर्ड परीक्षेस सामोरे जावे!असे प्रतिपादन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय,गढी चे प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी केले.ते पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आयोजित " शिवजन्मोत्सव सोहळा व 12 वी विद्यार्थ्यांना निरोप समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणुन बोलत होते.त्यांनी पुढे बोलताना सांगितले की वर्षभर केलेल्या अभ्यासाच्या बळावर नियोजन पूर्वक आत्मविश्वासाने भविष्यात आवडत्या क्षेत्रात करिअर करावे!असा संदेश देवून. विद्यार्थ्यां.12वी परीक्षेसाठी शुभेच्छा!दिल्या.या निरोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते. तर व्यासपीठावर प्रमुख वक्ते म्हणुन शिवश्री.डॉ. बाळासाहेब पिंगळे,व शिवशाहीर श्री.अनिल तिवारी उपस्थित होते.व्यासपीठावर जेष्ठ शिक्षणविस्तारधिकारी मा.श्री.बहीर साहेब,प्रा. डॉ सुनील जाधव प्रा.सोमनाथ घाडगे सांस्कृतिक विभागाचे प्रा. डॉ.रामकृष्ण प्रधान व कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे व सत्कार मूर्ती श्री. भारत कांडेकर यांची उपस्थिती होती. प्रारंभी प्रमुख वक्ते व मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. व दीप प्रज्वलाने या कार्यक्रमास प्रारंभ झाला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी केले. यानंतर वर्षभरात विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाला. महाविद्यालयातील वरिष्ठ लिपिक श्री. भारत कांडेकर यांचा सेवानिवृत्ती निमित्त मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. या नंतर वक्ते शिवश्री डॉ.बाळासाहेब पिंगळे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानातून शिवरांयाचा इतिहास विद्यार्थ्यासमोर मांडला. ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री. बहीर साहेब यांनी विद्यार्थ्यांनी नियोजनात्मक अभ्यास करून परीक्षेला सामोरे जावे! असं सांगून विद्यार्थ्यांना परिक्षासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी बारावीच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयांमध्ये अध्यापन आणि विविध उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून महाविद्यालयातील अनेक आठवणी सांगितल्या. शिवशाहीर श्री.अनिल तिवारी यांनी आपल्या पहाडी आवाजातील पोवाड्यातून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबर त्यांच्यावर संस्कार होण्यासाठी महाविद्यालयामध्ये विविध उपक्रम राबविले जातात. या व्याख्यानातुन विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन कार्य समजून घ्यावे! आणि भविष्यामध्ये चांगला अभ्यास करून बारावीच्या परीक्षेला सामोरे जावे! असे सांगून परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या! या कार्यक्रमाचे संचलन कु. कार्तिकी जगदाळे व कुमारी मीरा गाडेकर या विद्यार्थिनीने केले तर आभार कु. अस्मिता मुंडे या विद्यार्थिनींनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागाचे बापू घोक्षे, प्रा.डॉ. रामकृष्ण प्रधान,प्रा. डॉ.अशोक देवगुडे श्रीमती प्रा. डॉ.कल्पना घारगे,प्रा. डॉ.प्रविण शिलेदार,प्रा. शिवाजीराव भोरे व प्रा.सतिश जरांगे,प्रा.केशव सुर्वे,प्रा.गोपाळ धांडे, प्रा.बाळासाहेब जोशी,प्रा.डॉ.गोविंद बामदळे, प्रा.आनंद भगत,प्रा.बजरंग डिसले ग्रंथपाल प्रा.सौ.ज्योती रकटे ,श्री.शहाजी लवुळ,श्री.कुणाल काळे,श्री.नामदेव पोटफाडे,श्री.दत्ता चादर व श्रीमती साळुबाई नाईकनवरे यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे फेसबुक लाईव्ह प्रक्षेपण सुप्रसिद्ध नाटककार प्रा. बापू घोक्षे यांनी केले. व शेवटी राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ फेब्रुवारी २०२६


## लाडक्या बहिणींना मोठा दिलासा!: E-KYC पोर्टल पुन्हा सुरू




**मुंबई** : राज्यभरात अनेक लाडक्या बहिणींना पैसे मिळाले नसल्याने काही ठिकाणी मोर्चे काढण्यात आले होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरताना अनेक महिलांना ई-केवायसी संदर्भातील पर्याय निवडताना काही चुकीचे पर्याय निवडले गेल्याने अनेक महिलांचे पैसे थकले होते. परंतु, आता या महिलंनया दिलासा मिळणार असल्याचे समोर आले आहे. महिला व बाल विकास विभागाने ई-केवायसीचे पोर्टल पुन्हा सुरू केले असून ई-केवायसी दुरुस्ती आता ३१ मार्चपर्यंत करता येणार आहे.

लाडकी बहीण योजनेचे ई-केवायसी पोर्टल आजपासून पुन्हा एकदा सुरू करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून ई-केवायसीचे पोर्टल बंद असल्याने अनेक महिलांचे पैसे थकले होते. यामुळे लाडक्या बहीणींनी राज्यातील अनेक भागांमध्ये आक्रोश व्यक्त करत मोर्चे काढले होते. याची गंभीर दखल घेत राज्य महिला व बालविकास विभागाने आदेश काढ्हून पोर्टल सुरू केलए आहे. या निर्णयामुळे लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला आहे.

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांनी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी द्वारे आधार प्रमाणीकरण प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र, ही प्रक्रिया पार पाडताना अनेक महिलांकडून कुटुंबातील सदस्यांच्या सरकारी नोकरी किंवा निवृत्तीवेतनाबाबतचा पर्याय निवडताना तांत्रिक चूक झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. कुटुंबातील कोणी सदस्य सरकारी विभाग, मंडळ किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेत नियमित/कंत्राटी कर्मचारी आहे का, या प्रश्नाचे उत्तर देताना चुकीचा पर्याय निवडल्या गेल्यामुळे अनेक पात्र महिलांच्या अर्जांबाबत संभ्रम निर्माण झाला होता.

या त्रुटींमुळे लाभार्थी महिलांच्या पात्रतेची खात्री करण्यासाठी शासनाने २० जानेवारी रोजी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. परंतु, ही पडताळणी प्रक्रिया अधिक जलद आणि सुटसुटीत व्हावी, अशी मागणी लाभार्थी महिला आणि क्षेत्रीय कार्यालयांकडून सातत्याने केली जात होती. प्रत्यक्ष पडताळणीमध्ये येणाऱ्या अडचणी आणि वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी ऑनलाईन पद्धतीनेच माहिती सुधारण्याची संधी देण्याची विनंती सरकारकडे करण्यात आली होती.

याची दखल घेत प्रशासनाने ई-केवायसी प्रक्रियेत बदल करण्याची पुन्हा एकदा संधी उपलब्ध करून दिली आहे. ज्या महिलांनी माहिती भरताना चुकीचा पर्याय निवडला होता, त्यांना आता आपल्या अर्जात ऑनलाईन सुधारणा करता येणार आहे. ही दुरुस्ती करण्याची अंतिम मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात आली असून, यामुळे हजारो महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे आणि योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

दरम्यान, आता जानेवारी महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींना कधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. डिसेंबर महिन्याचा हप्ता हा १४ जानेवारी रोजी लाडक्या बहीणींच्या खात्यात जमा झाला होता. आता जानेवारीचा देखील त्याच दरम्यान फेब्रुवारी महिन्यात होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे महायुतीच्या नेत्यांकडून विशेषतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अनेक ठिकाणी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचार सभेत बोलताना लाडक्या बहीणींचे २१०० रुपये करणार असल्याचे आश्वासन दिले आहे.

## साहित्यवाटेची सुरुवात : कन्नडच्या शब्द प्रवासाची कहाणी

**क**न्नड तालुक्यातील साहित्य चळवळीची बीजे रोवली गेली ती आमचे ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. शिवाजी हुसे सर यांच्या दूरदृष्टीतून. नव्या लेखक-कवींना एकत्र आणण्याचा ध्यास त्यांनी घेतला आणि “कन्नड तालुका साहित्य परिवार” या व्हॉट्सॲप समूहाची निर्मिती केली. सुरुवातीला प्रकाश शहरवाले, संदीप वाकडे, अरुण थोरात, प्रवीण दाभाडे, शिवनाथ गायकवाड, का.का. थोरात आदी कवींना एकत्र करण्यात आले. या विखुरलेल्या शब्दांना एकत्र येण्यासाठी एक व्यासपीठ मिळाले आणि आमच्या लेखणीला नवी दिशा मिळू लागली. एका समूहात सर्व नवोदित लेखक जमल्याने पुढील वाटचाल ठरवणे सुलभ झाले. सरांचा हेतू स्पष्ट होता—कन्नड तालुक्यातील साहित्य चळवळ रुजावी, बहरावी आणि वटवृक्षासारखी विस्तारावी.या उद्देशाने शिवाजी कॉलेज, कन्नड येथे एक बैठक आयोजित करण्यात आली. त्या बैठकीत एक महत्त्वाचा निर्णय झाला—दरवर्षी राज्यस्तरीय कविता महोत्सव आयोजित करायचा. महाराष्ट्रातील नामवंत कवी, साहित्यिक आणि अभ्यासक यांना आमंत्रित करून त्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा लाभ घ्यायचा. त्या निर्णयातूनच राज्यस्तरीय कविता महोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि पहिला महोत्सव कन्नड तालुक्यातील पवित्र व प्रसिद्ध देवस्थान—वाकी येथे घेण्याचे निश्चित झाले.माझ्यासाठी ही एक नव्याने उघडणारी दारं होती. कविता लिहिण्याचा अनुभव होता; पण मंचावर सादर करण्याचा नव्हता. मात्र, या महोत्सवाच्या आधी शिवाजी कॉलेजमध्ये सरांनी आयोजित केलेल्या छोटेखानी कवी संमेलनात मला कविता सादर करण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांकडून आणि उपस्थितांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने माझ्या मनात आत्मविश्वासाचा दिवा पेटला. “मी कविता सादर करू शकतो” हा विश्वास त्या दिवशी मनात घट्ट बसला. आणि मग “वाकी”, तालुका कन्नड येथे वाकी संस्थानाच्या अनमोल सहकार्याने होणाऱ्या राज्यस्तरीय महोत्सवासाठी मी सज्ज होऊ लागलो.तो दिवस अखेर उजाडला. मी आणि प्रवीण दाभाडे सर मोटरसायकलने जाण्याचे ठरवले होते; पण वैजापूरचे शेतीमातीकार कवी अशोकजी गायकवाड सर यांचा फोन आला—“प्राचार्य विकास जगताप सर यांच्या गाडीत आपण सर्वजण जाऊ.” आम्ही पिशोर नाका येथे त्यांच्या प्रतीक्षेत उभे राहिलो. थोड्याच वेळात ते आले. चहापाण्याचा आस्वाद घेत आम्ही वाकीकडे निघालो. कन्नड ते वासडीचा रस्ता मोकळा व सुरेख होता; पण करंजखेड रोड लागताच गाडीचा प्रवास खडतर झाला. हलक्या आदळआपटीतून आम्ही वाकीला पोहोचलो.वाकी संस्थानात प्रवेश करताच पावित्र्याची जाणीव मनात दाटून आली. मंदिरात दर्शन घेऊन आम्ही संमेलनस्थळी पोहोचलो. तोपर्यंत जालना, छत्रपती संभाजीनगर, सिल्लोड येथून कवी आणि रसिकांची गर्दी जमू लागली होती. पहिल्या राज्यस्तरीय कविता महोत्सवाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ कवी व कथालेखक डॉ. प्रभाकर शेळके यांची निवड झाली होती. त्यांची उपस्थिती कार्यक्रमाला वेगळीच ऊर्मी देणारी होती.मासाहेब जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. महाराष्ट्रातील नामवंत सूत्रसंचालक कवी संदीप ढाकणे यांनी सूत्रसंचालनाची धुरा सांभाळली. प्रास्ताविकात डॉ. शिवाजी हुसे सरांनी कन्नड तालुक्यात साहित्य चळवळ रुजावी आणि ती जागतिक स्तरावर पोहोचावी, असा संकल्प व्यक्त केला. तर माझे गुरुवर्य प्राचार्य डॉ. विजय भोसले सर यांनी या साहित्य चळवळीला माझा कायम पाठिंबा राहील, असे सांगून आम्हा नवोदित कवींना अनमोल असे मार्गदर्शन केले. डॉ. प्रभाकर शेळके यांनी “कवी आणि कविता” या विषयावर मार्गदर्शन करताना शेतीमातीच्या वेदना जाणून कविता लिहा, हा मोलाचा संदेश दिला आणि आपल्या बहारदार कवितांनी रसिकांच्या मनाचा ठाव घेतला.कवी संमेलनाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ गझलकार डॉ. राज रणधीर आणि डॉ. एकनाथ शिंदे यांनी केले. त्या मंचावर मी शेतकरी आत्महत्येवर आधारित माझी पहिली कविता सादर केली. लाऊडस्पीकर किती अंतरावर असावा, हेही मला ठाऊक नव्हते. तेव्हा ज्येष्ठ कवी सुनील डोके सरांनी सूचनांनी मला मार्गदर्शन केले. ती कविता सादर करताना मनात धडधड होती; पण शब्दांनी साथ दिली.त्या दिवशी सर्व कवींनी आपापल्या कविता सादर केल्या. त्यात आपल्या मधुर आवाजाने सर्वांच्या मनावर छाप टाकली ती दिवंगत कवी मित्र विकास जगताप यांनी. आज ते आपल्यात नाहीत. कोरोनाने त्यांना हिरावून नेले. तिफण परिवाराचा एक अनमोल हिरा हरपला. पुढे त्यांच्या “बांधावर बाप उभा” या कवितासंग्रहासाठी अशोकजी गायकवाड सरांनी अथक परिश्रम घेतले. प्रस्तावना लिहून आणून देण्याची जबाबदारी माझ्यावर आली. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी ना.धो. महानोर यांची प्रस्तावना मिळावी अशी इच्छा होती; परंतु परिस्थितीमुळे ती शक्य झाली नाही. अखेर सोयगावचे नामांकित कवी प्रिय मित्र गोपाल इंगळे यांच्या अनमोल सहकार्याने प्रसिद्ध कवी व पाठ्यपुस्तक लेखक अशोकजी कौतिक कोळी सर यांच्या लेखणीतून प्रस्तावना साकारली आणि जगताप सरांचा कवितासंग्रह त्यांच्या वर्षश्राद्धाच्या दिवशी त्यांच्या गावी प्रकाशित झाला. नियतीचे हे विलक्षण वळण होते.प्रकाशन सोहळ्याला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी श्री अनंत राऊत आणि सरला बेटाचे महंत सन्माननीय श्री रामगिरी महाराज यांची उपस्थिती लाभली. आज त्यांच्या “आळवणी” या कवितेचा समावेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात आहे—हे आमच्यासाठी अभिमानाचे आहे.साहित्य सोहळा संपल्यानंतर सर्वांनी मिळून दाळपट्ट्यांचा आस्वाद घेतला. अध्यक्ष प्रभाकर शेळके सरांसोबत जेवण करण्याची संधी मिळाली—तो क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय ठरला. रात्री आम्ही कन्नडकडे परतलो, आणि त्या दिवसापासून साहित्याचा नवा प्रवास सुरू झाला.या प्रवासाने महाराष्ट्रातील नामांकित कवी-लेखकांशी संवाद साधण्याची संधी दिली. कविता, कथा, कादंबरी यांचे गूढ उलगडू लागले. शब्दांच्या नव्या विश्वाची दारे उघडली. आणि मनात एकच भाव दाटून आला—हा साहित्याचा मार्ग केवळ प्रवास नाही, तर आयुष्याचा अर्थ शोधण्याची अखंड साधना आहे.अन् ही आनंददायी साधना सुरू झाली.

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ फेब्रुवारी २०२६


# उमेदवारांना बळ देण्यासाठी दिग्गज नेत्यांनी गाजवल्या प्रचारसभा







**कन्नड (अरुण थोरात) :** जि.प. पं.समीती निवडणुकीत कन्नड तालुक्यातील आपआपल्या उमेदवार कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी दिग्गज नेत्यांनी मैदानात उतरत सभांचा धुराळा उडवून दिला.प्रचाराचा रणसंग्राम शांत झाला असला तरी जोश मात्र कायम आहे. कन्नड तालुक्यात होत असलेल्या आठ जि.प. गट व सोळा गणांत आघाडी, युतीचा खेळखंडोबा करीत सर्वच राजकीय पक्ष, आघाड्यांनी उमेदवार ऊभे केले, तर काही ठिकाणी अपक्षांना पाठिंबा देत अधिकाधिक जागा पदरात पाडून घेण्यासाठी शेवट पर्यंत जोर लावला. ही निवडून कार्यकर्त्यांची असल्याने, व त्यांच्या विजयात आपले भविष्य दडल्याने जिल्हा पातळी ते राज्य पातळी वरील नेते मैदानात उतरले होते. पक्षांनी भौगोलिक, सामाजिक मतांची समीकरणे लक्षात घेत प्रचारक नेत्यांची निवड ही अगदी योग्य रितीने केली होती. यात भाजप ने आघाडी घेत पिशोर गटात मा.मंत्री आ. पंकजा मुंडे, नागद गटात भाजप पुरस्कृत अपक्ष उमेदवार प्रचारासाठी चाळीसगाव चे आमदार मंगेश चव्हाण, चिंचोली लिंबाजी गटात आ. सुरेश धस, खा.डॉ. भागवत कराड, जेहूर चापानेर करंजखेडा गटात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, चापानेर गटात आपल्या मुली साठी माजीमंत्री आ. बबनराव लोणीकर, यांच्या सह जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी प्रचारसभा घेत मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. शिवसेनेने देवगाव रंगारी गटात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जेहूर गटात खा. संदिपान भुमरे, यांनी सभा घेतली. आ. संजना जाधव यांनी ही तालुक्यातील गट गण पिंजून काढले. उबाठा शिवसेना उमेदवारा साठी आ. अंबादास दानवे यांनी सभा घेत सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले. रायभान जाधव विकास आघाडी उमेदवारांना बळ देण्यासाठी प्रमुख माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी सबंध तालुका पिंजून काढला. जि.प. निवडणुकीत एम आय एम पक्ष पहिल्यांदाच उतरत मा.खा.

इम्तियाज जलील यांनी आपल्या उमेदवारांसाठी घाटमाथ्यावर सभा घेतली. राष्ठवादी उदेवारांसाठी आ. सतिश चव्हाण यांनी काही ठिकाणी सभा घेत

मतदान करण्याचे अवाहन केले. त्यामुळे एखाद्या जि.प. निवडणूक प्रचारात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात राज्यपातळी वरील नेते, मंत्री प्रचारात उतरल्याचे तालुक्यातील मतदारांनी पाहिले. याचा कितपत परिणाम मतदारांवर झाला. हे मतमोजणी नंतर कळेल

## त्यागमूर्ती रमाई

दीन दलीतांची तू माता
सहनशीलतेची मूर्ती
तुझ्या अफाट कार्याची
जगभरात पसरली किर्ती

दु:ख कवटाळून जगली
ना सुख भोगले कधी
उच्च तुझे विचार
राहणी होती साधी

बाबासाहेबांचा आधार होवून
केलं सोनं आयुष्याचं
अनाथासाठी सतत झिजून
नातं जपलं मानवतेचं

करूणेची तू मूर्ती
स्वाभिमान तुझा अलंकार
बाबासाहेबांच्या उच्च शिक्षणासाठी
सोसलेस दु:खाचे भार

कष्ट,त्याग, संघर्ष
हेची तुझे खरे धन
त्यागमूर्ती माता रमाईस
माझे विनम्र अभिवादन




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106


# सहाव्या राष्ट्रीय लाठी स्पर्धेत गुरुकुल इंग्लिश स्कूलची चमकदार कामगिरी, तामिळनाडूत गाजवले नाव




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** नुकत्याच पार पडलेल्या तामिळनाडू राज्यात ता. २९, ३०, ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या सहाव्या लाठी राष्ट्रीय अजिंक्य पद स्पर्धेत देशभरातील नोंदणीकृत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेत आठ वर्षाखालील वयोगटात देवांश राहुल चिलोबा यांनी एकमलाठी व दुय्यमलाठी क्रीडा प्रकारात अनुक्रमे सुवर्ण व कांस्य पदक पटकावले. अंडर टेन मुलींच्या गटात लाव्या नागनाथ वाघमारे हिने एकमलाठी क्रीडा प्रकारात सुवर्णपदक मिळवले, तर बारा वर्षाखालील मुलींच्या गटात भूमिका धनराज स्वामी हिने एकमलाठी क्रीडा प्रकारात रौप्य पदक पटकावून शाळेच्या यशात भर घातली. यशस्वी खेळाडूंना महागुरु सुभाष मोहिते, तमिळनाडू लाठी असोसिएशनचे सचिव सतीश राज, अध्यक्ष बालाकृष्णन यांच्या हस्ते पदक प्रदान करून गौरविण्यात आले. खेळाडूंना प्रशिक्षक शेख महमदरफी यांचे मार्गदर्शन लाभले. गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका मयुरी आनंद चौधरी, शिक्षकवर्ग व पालकांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ फेब्रुवारी २०२६

# रमाबाई आंबेडकरांचे सामाजिक परिवर्तनाच्या पायाभरणीतील योगदान

७ फेब्रुवारी हा दिवस भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत अर्थपूर्ण, संवेदनशील आणि प्रेरणादायी ठरतो. हा दिवस म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनसाथी, त्यागमूर्ती, संघर्षशील आणि मौनात राहूनही सामाजिक क्रांतीची मशाल पेटती ठेवणाऱ्या रमाबाई भिमराव आंबेडकर यांचा जयंती दिन होय. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय विषमता, सामाजिक अन्याय, स्त्रीदमन, आर्थिक दारिद्र्य आणि मानसिक गुलामगिरीच्या पार्श्वभूमीवर रमाबाईंचे जीवन केवळ एका महापुरुषाच्या पत्नीचे जीवन नव्हते. ते जीवन एका स्वतंत्र सामाजिक योद्ध्याचे, अपार सहनशीलतेचे, निःस्वार्थ त्यागाचे आणि मौनातून घडलेल्या क्रांतीचे जिवंत प्रतीक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक, शैक्षणिक आणि राजकीय संघर्षामागे रमाबाईंच्या कष्टांची, वेदनांची आणि शांत पाठबळाची भक्कम भिंत उभी होती, हे वास्तव समजून घेतल्याशिवाय आंबेडकरी चळवळीचे संपूर्ण चित्र स्पष्ट होत नाही.रमाबाई आंबेडकर यांचा जन्म अत्यंत साध्या, उपेक्षित आणि सामाजिकदृष्ट्या वंचित परिस्थितीत झाला. त्या काळातील दलित समाजाचे जीवन म्हणजे अपमान, अस्पृश्यता, दारिद्र्य, बहिष्कार आणि सततची असुरक्षितता यांचा संगम होता. स्त्री म्हणून जन्माला येणे म्हणजे दुहेरी अन्याय सहन करणे, हीच त्या समाजाची वास्तवता होती. शिक्षण, स्वातंत्र्य, निर्णयक्षमता, आरोग्य आणि आत्मसन्मान या मूलभूत हक्कांपासून स्त्रीला वंचित ठेवणारी सामाजिक रचना रमाबाईंच्या आयुष्यावरही खोलवर परिणाम करत होती. बालपणापासूनच कष्ट, काम, जबाबदाऱ्या आणि मौनातील सहनशीलता हेच त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग बनले. लहान वयातच जीवनातील कठोर वास्तव स्वीकारावे लागल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व संयमी, सहनशील आणि आत्मसंयमी बनले.अत्यंत लहान वयात रमाबाईंचा विवाह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झाला. हा विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील कौटुंबिक नाते नव्हते, तर तो एका व्यापक सामाजिक संघर्षाचा प्रारंभ होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आयुष्य शिक्षण, विचार, आंदोलन, संघर्ष आणि सामाजिक विरोधाने भरलेले होते. या संघर्षांचा भार रमाबाईंनाही समानतेने पेलावा लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणासाठी, नोकरीसाठी आणि समाजसुधारणेसाठी सातत्याने व्यग्र असताना रमाबाई घर, कुटुंब, मुले आणि सामाजिक वास्तव यांचा समतोल राखत होत्या. संसार सांभाळताना त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ध्येयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले नाही, उलट त्या ध्येयांवर त्यांनी अढळ विश्वास ठेवला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षण भारताबाहेर सुरू असताना रमाबाईंवर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी येऊन पडली. आर्थिक टंचाई, अन्न-वस्त्राचा अभाव, आजारपण, सामाजिक उपेक्षा आणि मानसिक ताण हे त्यांचे रोजचे वास्तव होते. अनेक वेळा उपाशीपोटी दिवस काढावे लागले, साध्या वस्त्रांवर समाधान मानावे लागले. तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, हीच त्यांची ठाम भूमिका होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळवलेले ज्ञान हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नसून संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठी आहे, याची रमाबाईंना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या वेदनांवर मौन धारण करून सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाला बळ दिले.रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील सर्वांत वेदनादायी आणि हृदयद्रावक अध्याय म्हणजे त्यांच्या मुलांचे अकाली निधन होय. मातृत्वाचा आनंद अनुभवण्याआधीच त्यांना असह्य दुःख सहन करावे लागले. एका मागोमाग एक अपत्य गमावणे ही कोणत्याही आईसाठी अकल्पनीय वेदना असते. रमाबाईंच्या आयुष्यात ही वेदना वारंवार आली. तरीही त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर त्याचा परिणाम होऊ दिला नाही. स्वतःच्या दुःखाला बाजूला ठेवून समाजासाठी झटणाऱ्या पतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, हेच त्यांनी आपले जीवनधर्म मानले. रमाबाईंचा हा त्याग भारतीय स्त्रीच्या सहनशीलतेचा, मानसिक बळाचा आणि निस्वार्थ प्रेमाचा सर्वोच्च नमुना आहे.रमाबाई आंबेडकर या जरी प्रत्यक्ष सामाजिक आंदोलनांच्या मंचावर दिसत नसल्या, तरी त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे, मूलभूत आणि निर्णायक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना स्थैर्य देणारे, त्यांच्या संघर्षाला मानसिक आधार देणारे आणि त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण काळात खंबीरपणे साथ देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे रमाबाई आंबेडकर होत्या. अस्पृश्यता निवारण, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, धर्मांतर चळवळ आणि भारतीय संविधाननिर्मिती यांसारख्या ऐतिहासिक कार्यांसाठी बाबासाहेबांना जे मानसिक बळ आवश्यक होते, ते रमाबाईंच्या निस्वार्थ त्यागातून मिळाले.रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, शांत, संयमी आणि आत्मसन्मानाने भरलेले होते. प्रसिद्धी, सन्मान, मान्यता किंवा सार्वजनिक गौरवाची अपेक्षा त्यांनी कधीच ठेवली नाही. समाजाने अनेकदा त्यांच्याकडे केवळ 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्नी' म्हणून पाहिले, परंतु प्रत्यक्षात त्या एका स्वतंत्र विचारसरणीच्या, मूल्यनिष्ठ आणि आत्मसन्मान जपणाऱ्या स्त्री होत्या. अपमान, दुर्लक्ष, अवहेलना आणि कष्ट सहन करूनही त्यांनी कधी तक्रार केली नाही. त्यांचे मौन हे कमजोरीचे नव्हे, तर अंतर्गत शक्तीचे, संयमाचे आणि आत्मविश्वासाचे प्रतीक होते.भारतीय समाजातील स्त्री-पुरुष समानतेच्या चर्चेत रमाबाई आंबेडकर यांचे जीवन अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यांनी स्त्रीवादावर भाषणे केली नाहीत, लेखन केले नाही, परंतु त्यांच्या जीवनाने स्त्रीच्या सामाजिक भूमिकेची नवी व्याख्या केली. शिक्षणापासून वंचित असूनही त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक ध्येयांना त्यांनी पूर्ण पाठिंबा दिला. त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून ती सामाजिक परिवर्तनाची शांत पण प्रभावी वाहक असते.रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील दारिद्र्य हे केवळ आर्थिक नव्हते, तर ते सामाजिक अन्यायाचे आणि संरचनात्मक विषमतेचे प्रतीक होते. जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार, धार्मिक रूढी आणि स्त्री म्हणून दुय्यम स्थान या सगळ्यांचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर झाला. तरीही त्यांनी परिस्थितीला दोष देत बसण्याऐवजी आशेचा मार्ग स्वीकारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर, मूल्यांवर आणि ध्येयांवर ठेवलेला विश्वास हेच त्यांच्या जगण्याचे बळ होते. त्यांच्या जीवनातून हे अधोरेखित होते की सामाजिक परिवर्तनासाठी फक्त पुढे उभे राहणारे नेतेच नव्हे, तर मागे उभे राहून आधार देणारे व्यक्तिमत्त्वही तितकेच महत्त्वाचे असते.रमाबाई आंबेडकर यांचे जीवन स्त्रीवादाचा अप्रत्यक्ष पण प्रभावी आधारस्तंभ आहे. त्यांनी शब्दांतून स्त्रीवाद मांडला नाही, परंतु त्यांच्या जीवनप्रवासाने स्त्रीच्या दुहेरी संघर्षाचे वास्तव जगासमोर ठेवले. जातीय अन्याय आणि पितृसत्ताक व्यवस्था या दोन्हींचा सामना करत त्यांनी आपले जीवन जगले. आजच्या स्त्री-अभ्यासात रमाबाईंच्या जीवनाकडे केवळ सहनशीलतेचे प्रतीक म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत मोलाचे योगदान देणाऱ्या स्त्री म्हणून पाहिले जाणे आवश्यक आहे.आजच्या काळात रमाबाई आंबेडकर यांचे स्मरण केवळ औपचारिक जयंतीपुरते मर्यादित राहू नये. त्यांच्या जीवनाचा अभ्यास करताना स्त्री-संघर्ष, दलित प्रश्न, कुटुंबातील त्याग, मानसिक सहनशीलता, भावनिक श्रम आणि सामाजिक परिवर्तनातील अदृश्य योगदान या सर्व पैलूंवर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. रमाबाईंच्या जीवनकथेचा समावेश शिक्षणक्रमात, सामाजिक चर्चेत, स्त्री-अभ्यासात आणि दलित साहित्याच्या अभ्यासात होणे ही काळाची गरज आहे.रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे भारतीय समाजाच्या वास्तवाचे आरसेपण आहे. त्या समाजाच्या कडेला उभ्या राहिलेल्या, पण परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेल्या स्त्रीचे प्रतीक आहेत. त्यांनी कधीही स्वतःसाठी इतिहास लिहिला नाही, परंतु त्यांच्या त्यागाने इतिहास घडविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्यामागील अदृश्य शक्ती म्हणून रमाबाईंचे स्थान अढळ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना त्यांच्या मूल्यांना आत्मसात करणे, हेच त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य ठरेल.रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ अभिवादन न करता त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आजच्या सामाजिक प्रश्नांकडे नव्या दृष्टीने पाहिले पाहिजे. स्त्री सक्षमीकरण, सामाजिक न्याय, मानवी मूल्यांची जोपासना, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या अंमलबजावणीसाठी रमाबाईंचे जीवन मार्गदर्शक ठरते. त्यांचे मौन आजही आपल्याशी बोलते, त्यांचा त्याग आजही समाजाला प्रश्न विचारतो आणि त्यांचे जीवन आजही परिवर्तनाची प्रेरणा देते. म्हणूनच रमाबाई भिमराव आंबेडकर या केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नाहीत, तर त्या वर्तमान आणि भविष्याला दिशा देणाऱ्या विचारांची अखंड साक्ष आहेत.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ फेब्रुवारी २०२६

# पाणलोट संवर्धनात युवकांची भूमिका निर्णायक - डॉ. दैवत सावंत




**कृष्णापूर :** 'जल है तो जीवन है' हे विधान आज केवळ घोषवाक्य न राहता वास्तव बनले आहे. जगाच्या पृष्ठभागावर सुमारे ७१ टक्के पाणी असले, तरी त्यातील केवळ ०.२ टक्के पाणीच पिण्यासाठी उपलब्ध आहे. वाढती लोकसंख्या, अनियमित पर्जन्यवृष्टी, जंगलतोड आणि पाण्याचा अमर्याद अपव्यय यामुळे पाणीटंचाईची समस्या दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालली आहे. भविष्यातील संघर्ष हे पाण्यासाठीच होतील, असे मत तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. त्यामुळे पाण्याचे संवर्धन करणे ही काळाची अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन डॉ. दैवत सावंत, मराठी विभागप्रमुख,गजानन कला व विज्ञान महा.गोळेगाव यांनी कृष्णापूर येथे आयोजित केलेल्या एन.एस.एस.कॅम्प, कला महाविद्यालय,बिडकीन कार्यक्रमाच्या बौद्धीक सत्रामध्ये 'युवकांची पाणलोट संवर्धनात भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. आज पाणीटंचाई ही केवळ उद्याची भीती न राहता वर्तमानातील जळजळीत वास्तव ठरली आहे. अनेक ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठी आवश्यक पाण्याची तीव्र कमतरता जाणवत आहे. अशा परिस्थितीत पाण्याचे योग्य नियोजन व शाश्वत व्यवस्थापनासाठी पाणलोट संवर्धन हा अत्यंत प्रभावी व दीर्घकालीन उपाय मानला जात आहे. पावसाचे पाणी अडवून त्याचा साठा करणे व ते जमिनीत मुरवून भूजलपातळी वाढवणे, हीच पाणलोट संवर्धनाची मुख्य संकल्पना आहे. या कार्यात युवकांची भूमिका अत्यंत निर्णायक ठरते. युवकांकडे असलेली ऊर्जा, कार्यक्षमता, कल्पकता आणि समाजात बदल घडवण्याची ताकद पाणलोट संवर्धनासाठी उपयुक्त ठरू शकते. युवक श्रमदानाच्या माध्यमातून बंधारे, समतल चर, कंटूर बंडिंग यांसारख्या जलसंधारणाच्या कामांमध्ये सक्रिय सहभाग घेऊ शकतात. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनामुळे पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते आणि पर्यावरणाचा समतोल टिकून राहतो. तसेच सोशल मिडिया, मोबाईल ॲप्स आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने युवक पाणी संवर्धनाबाबत प्रभावी जनजागृती करू शकतात. घरगुती तसेच सार्वजनिक ठिकाणी पाण्याचा अपव्यय टाळण्याचा आदर्श युवकांनी समाजासमोर ठेवणे गरजेचे आहे. युवक मंडळे, NSS, NCC व विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून संघटितपणे काम केल्यास पाणलोट संवर्धन चळवळीला निश्चितच बळ मिळू शकते. पाणलोट संवर्धनामुळे भूजलपातळी वाढते, शेतीसाठी पुरेसे पाणी उपलब्ध होते आणि पर्यावरणाचा समतोल राखला जातो. विशेषतः शेतकरी वर्गासाठी पाणी हे जीवनसत्त्व असून, योग्य पाणी व्यवस्थापनामुळे कृषी उत्पादनात वाढ होऊन आर्थिक स्थैर्य प्राप्त होते. आजचा युवक जर पाणलोट संवर्धनाच्या कार्यात सक्रिय झाला, तर "पाणी अडवा, पाणी जिरवा" हा मंत्र केवळ घोषवाक्य न राहता एक व्यापक लोकचळवळ बनेल. युवकांच्या पुढाकारामुळे प्रत्येक थेंबाचे सोनं होईल आणि भविष्यातील पिढ्यांसाठी पाणीसमृद्ध भारत घडू शकेल,अशी मांडणी डॉ. दैवत सावंत यांनी केली. मराठी कविता निर्मिती प्रक्रिया याविषयावर डॉ. संजय शिंदे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी सत्राध्यक्ष म्हणून डॉ. मुखत्यार शेख यांनी जबाबदारी सांभाळली. कार्यक्रम अधिकारी प्रा. मिलिंद ठोकळे, डॉ. रमेश गायकवाड, प्रा. काळे मॅडम, डॉ. सय्यद सर, अजय वानखेडे ,गायगवाड व मोठ्या संख्येने एन.एस.एस. स्वयंसेवक उपस्थित होते.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


# ज्वालामुखी फाईल

एपस्टाइन फाईल—
ही फक्त कागदपत्रं नाहीत,
ही सत्तेच्या तिजोरीत दडलेली
अजुन धगधगती राख आहे.
ती कागदांची गठ्ठी नाही,
तो आरसा आहे—
ज्यात सत्तेचे चेहरे
मेकअपशिवाय,
मुखवटे गळून पडलेले दिसतात.
काही नावं सोनेरी अक्षरात,
काही मुली नोंदीतही नाहीत—
काही लापता,
जणू त्या कधी होत्याच नाहीत.
प्रत्येक पानावर प्रश्नांची तलवार—
कोण विकत घेत होतं बालपण?
कोण विकत होतं मौन?
बाजारात बालपणालाही किंमत असते का?
कोणत्या सभ्यतेत मौनाला करार म्हणतात?
फाईली सांगतात वास्तव—
संबंध मोठे — मुली लहान,
सत्ता उंच — आवाज दाबलेले.
आणि तरी हे सगळं "स्कँडल"—
जणू ही फक्त बातमी—
व्यवस्था नव्हे.
गुन्हे फक्त व्यक्तींचे नसतात—
ते मौन पाळणाऱ्या खुर्च्यांचेही असतात.
मिडिया कधी ओरडली,
कधी कुजबुजली,
कधी गप्प बसली—
कारण जाहिरातींचा आवाज
विवेकापेक्षा मोठा होता.
सभ्यता गगनचुंबी इमारतींनी मोजली जात नाही—
ती जी मुलांना सुरक्षित फुलू देते.
जर कायदा नावांसमोर वाकला,
तर तो कायदा नसतो—
ती गुडघे टेकलेली व्यवस्था असते.
लापता मुलींच्या कथा—
कोणत्या संग्रहालयात ठेवाल?
त्यांच्या न ऐकलेल्या आवाजांना
कोणता सन्मान द्याल?
आज ज्वालामुखी रस्त्यावर नाही—
तो लोकांच्या मनात आहे,
प्रत्येक पालकाच्या भीतीत,
प्रत्येक जाग्या नागरिकाच्या नजरेत.
भीतीला नाकारून प्रश्न उभे राहिले
की साम्राज्ये ध्वस्त होतात.
आज जर शांत राहिलो—
तर उद्या फाईली वाढतील.
म्हणून आज गरज आहे—
रोषाची नाही फक्त,
जागरूकतेची, एकजुटीची,
न झुकणाऱ्या प्रश्नांची.
आज जर उभे राहिलो,
तर मुली सुरक्षित वावरतील.

क्रांती म्हणजे दगड नाही—
क्रांती म्हणजे प्रश्नांचा मारा
ज्यांना विकत घेता येत नाही.
फाईली जाळून सत्य जळत नाही—
ते राखेतूनही पुरावा शोधतं.
जेव्हा जनता सवाल करते,
तेव्हा साम्राज्ये थरथरतात.
फाईली बंद होऊ शकतात,
पण इतिहासाचे अंगार
खोटेपण जाळत राहतात.
क्रांतीच्या घोषणा ठिणगी देतात—
पण क्रांती पेटते
जागरूक समाजाच्या प्रखर प्रश्नांनी.


**प्रभाकर गायकवाड**
छत्रपती संभाजीनगर

# महाराष्ट्र जनशक्ती


website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ फेब्रुवारी २०२६


# बुद्धांची सम्यक विचारधारा पेरणारा:- महाराजा प्रेसेनजित




**ख्या**तनाम व्याख्याते विचारवंत प्रा डॉ विजयकुमार कुमठेकर यांच्या शिद्हस्त चिंतन चिकित्सक अभ्यासक लेखणीतून तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या सम्यक जीवनशैलीच्या दृष्टीने मानवी मनाच्या उत्क्रांतीचे यथोचित साक्षेपी बुद्धदर्शन घडवणारे चिंतन 'बुध्दप्रिय मातंग राजा महाराजा प्रसेनजित' याचे लक्षवेधी श्रेयस या पुस्तकाचे आहे.तथागत भगवान बुद्धांच्या समकालीन असलेले प्रसेनजित.प्रस्तूत चरित्र ग्रंथाने मराठी चरित्र साहित्य वाचकांना व सर्वहरा मागास बांधवांना मांग-मातंग,महार चांभार बंधूंना हा तेजोमय इतिहास माहीत होणार आहे.प्रेसेनजित हे मातंग राजे होते मुळनिवाशी इथल्या भूमीतले ते अनार्य.खैबरखिंडीतून आले ते आर्य."पुर्वी आम्ही सारे बौद्ध होतो.आम्ही राजे महाराजेंच्या वंशाचे होतो.महार,मांग चांभार बंधूंना ब्राह्मणवादांचे गुलाम बनविले.पुढे बौद्धीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी याची जाणीव करून दिली.आम्हाला सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय गुलामीच्या काळ्याकुट्ट अंधारातून मुक्त केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर नसते तर या स्वतंत्र भारतात या देशातील कोट्यवधी अस्पृश्य हे मात्र आजही गुलाम असते.हे सत्य नाकारता येत नाही.(पृष्ठ 15प्रस्तावनेतून) हा संशोधन चरित्रात्मक ग्रंथ आहे.बुध्दप्रिय मातंग राजा, यांचे अतिशय समर्पक समृद्ध चरित्र प्रेरणा प्रेरक झाले आहे.पुर्वज आणि जन्म, बालपण आणि शिक्षण,प्रेसनजितांचा राज्यकारभार,राजा प्रसेनजितांच्या राण्या,राजा प्रसेनजितांची बहिण सुमन,राजा प्रसेनजित यांची मुलं,बुध्दप्रिय श्रावस्ती राजा प्रसेनजिताची राजधानी या प्रकरणात अतिशय आशय संपन्न माहिती उजागर होते.या चरित्रग्रंथाची मांडणी ही अतिशय सुलभ भाषेतून केल्यामुळे हा ग्रंथ वाचनीय झाला आहे.यातील जे ऐतिहासिक व पौराणिक पुरावे आहेत ते लेखकानी अतिशय संशोधनात्मक दखल घेतली आहे.जसे"महाराष्ट्रातील महार,मांग, चांभार मातंग हे शूर आणि लढवय्ये होते.ते राज्यकर्ते होते.त्यांने कित्येक युद्धात शौर्य गाजविले.असे असतांना षडयंत्र आणि कपट करून अत्यंत निर्दयीपणे त्यांना हीन-दीन बनविन्यात आले.त्यांनी कधीही उठाव करू नये म्हणून मनुस्मृती सारख्या ग्रंथाची निर्मिती करून व्यवसायाच्या आधारावर निर्माण करण्यात आलेल्या जात-वर्गाचे रुपांतर जातींमध्ये केले.या जातीवर अंतर्गत विवाह पद्धतीचे निर्बंध लावून लोकांना जातीअंतर्गत बंदिस्त करून ब्राह्मणवादाचे गुलाम बनविले.त्यांना जबरदस्तीने अज्ञानात आणि मुलभूत हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले.परंतू ब्राह्मण वर्णाचे मात्र अनेक जातींमध्ये विभाजन करण्यात आले नाही.ही बाब लक्षात घेतली पाहिजे "(मलपृष्ठ मजकूर) ही सखेद वेदनेची मिमांसा हा ग्रंथ करून जातो.म्हणून जातीअंताचा हा हुंकार उजागर करण्याचं काम हा चरित्रग्रंथ करतोच पण आजच्या समकालीन वास्तवाचे सम्यक संबुध्दांच्या मानवतावादी विचारांचे यथायोग्य चिंतन चिकित्सक यातून दिसून येते.बौध्दधम्माची दीक्षा घेणारे बुद्ध प्रिय प्रेसेनजित तथागत गौतम बुद्धाच्या सम्यक मार्गाचा अवलंब करतात.बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर महाराष्ट्रातील महार मांग चांभार मातंग या मुख्य अस्पृश्य जातींना बरोबर घेवून होतेच पण महाराष्ट्रातील तमाम सर्व अस्पृश्यांना स्वातंत्र्याच्या आंदोलनात सहभागी करून घेतले होते.त्यात मुख्यतः चांभार व मातंग समाज हा सुरूवाती पासूनच बाबासाहेबांच्या लढ्यात सहभागी होता.13 आक्टोबर 1935ला धर्मांतराची घोषणा झाली.बाबासाहेब म्हणाले "मी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो,पण हिंदू म्हणून मी मरणार नाही"(पृष्ठ 15) यांत तत्कालीन षडयंत्र रचले.बाबासाहेबांच्या चळवळीतून हे सर्वहारा अस्पृश्य अलिप्त राहिले पाहिजे.पण महाराज प्रेसेनजितच्या अनुवंशाचे महाराष्ट्रातील मातंग समाज मात्र धर्मांतराच्या घोषणेनंतर देखिल बाबासाहेबांच्यासोबत होता.हेअभिमानास्पद बाब आहे.हा बुद्धप्रिय मातंग राजा महाराजा प्रेसेनजित या चरित्रात,दुसरी राजधानी, स्वप्नांचा उलगडा, तथागत सम्यक संबुध्दांच्या विचारांने परिवर्तन!,राजा प्रेसेनजित आणि राजा बिंबीसार संबंध, मातंग राजा प्रेसेनजित यांची तथागतांवर अपार श्रध्दा, तथागतांच्या त्रिशरण पंचशील तत्वांचा अंगीकार करुन राजा प्रेसेनजितधम्मदीक्षा घेतात.आपल्याच भाचा जावाई यांच्या कडून पराभव स्वीकारावा लागतो,अति विश्वासू प्रेसेनजित यांच्या गुणाचे वर्णन ते खूप सात्विक होते.ते आपल्या मुलीप्रमाणेच इतर प्रजेवरही त्यांचा जीव होता.प्रजा आमची चांगली असल्यानेच आम्ही सुखाचे दिवस बघत आहोत.असे उघडपणे सांगत.काशी आणि कोसलच्या प्रजेवर त्यांचा खूप जीव होता.मात्र ते खूप लवकर दुसऱ्यावर विश्वास ठेवत.ते कुणावरही अविश्वास दाखवत नसतं.त्यामुळे त्यांना या स्वभावाचा फटाका सहन करावा लागला.अतिविश्वासूपणामुळे त्यांना अनेक धोके सहन करावे लागले आणि त्याचे परिणामही भोगावे लागले (पृष्ठ 115) डॉ विजयकुमार कुमठेकर यांच्या शिद्हस्त चिंतन चिकित्सक अभ्यासक लेखणीतून यथायोग्य मुद्देसूद चरित्र मांडणी हे लेखनाचे वैशिष्ट्य आहे."जो समाज इतिहास विसरतो,तो समाज इतिहास बदलू शकत नाही" डॉ बाबासाहेब आंबेडकर.हे तत्त्वचिंतक विचार कृतीयुक्तीतून यावे म्हणून हे निर्लेप नितळ श्रेध्दय भावनेतून चरित्र लेखन आहे."राजा प्रेसेनजित हे जातीने 'मांग तथा मातंग'होते हा इतिहास आजच्या पिढीला प्रेरणा देणारा आहे.कारण पुर्वाश्रमीचे येथील जवळपास सर्वच समुह बौद्ध अनुयायीच होते.परंतू प्रतिक्रांतीच्या दुष्टचक्रात तो पुन्हा नव्याने वेगवेगळ्या जातीत विभागला गेले.मात्र बुध्दांच्या सम्यक क्रांतीच्या पाऊलखुणा शोधणाऱ्या अनेक पिढ्या तयार होत आल्या आहेत.आपल्या जातीच्या पुर्वइतिहासाचा शोध आता अधिक जोमाने सुरू आहे.म्हणून राजा प्रेसेनजित यांचे चरित्र या पिढीला अधिक उपयोगी होणार आहे अशी माझी समजूत आहे "(पृष्ठ 8)एक सृजनशील निस्सीम भूमिका घेऊन चिंतन चरित्र अभ्यासक विवेचक समीक्षक साहित्यिक डॉ विजयकुमार कुमठेकर यांची सद्विवेकी भावना ही या चरित्र लेखना मागे आहे.खरा इतिहास उजागर करणे हे अभ्यासकांचे लक्षवेधी लक्षण आहे.हे चरित्र लेखन म्हणजे मानवी मुल्यांची स्नेही सन्मित्र पेरणी करून जाते.आपले पुर्वज किती मायाळू स्नेहाळू होते.आज आपणचं आपल्या जातभाईचे मुडदे पाडतो अहोत.माणुसकीचा खरा गहिवर देणारे हे चरित्र प्रेरणा प्रेरक शक्ती देणारे आहे.बुध्दकालीन हे लोकनायक महाराजा प्रेसेनजित मातंग समाजाचेही ते लोकनायक होते. लेखकांनी आपल्या अभ्यासकीय मर्यादेचेही विवेचन केले आहे.विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धधम्माचा अनुबंध सांगून नव्या ज्ञान प्रज्ञाची वाटा सुकर केल्या आहेत.तथागत सम्यक संबुध्द यांच्या विचारांची बांधिलकी ही लोककल्याणकारी असल्याने यात कर्मकांड व थोतांड अवतार नव्हते.तोच मार्ग सम्यक जीवनशैलीचा मार्ग या चरित्रग्रंथात बुद्धप्रिय मातंग राजा प्रेसेनजित यांचे आहे.मुखपृष्ठ संतोष धोंगडे, पुणे.अतिशय समर्पक समृद्ध ऐतिहासिक दस्तऐवज हत्तीच्या बलाचे बलदंड बाहू.आणि शांततेचे प्रतिक तथागत गौतम बुद्ध.प्रस्तूत चरित्रग्रंथ 'चलो बुध्द की और' या अभियानाचे प्रणेते,महाराजा प्रेसेनजितांची माहिती आणि प्रतिमा घरोघरी प्रसार-प्रचार व्हावी यासाठी अहोरात्र ध्यास घेतलेले, अँड.शिवराज कोळीकर यांना आदरपूर्वक..ही सविनय अर्पणपत्रिका चळवळीच्या योद्धे.याच्या विषयीची निस्सीम लेखनभक्ती दिसून येते.म्हणून डॉ विजयकुमार कुमठेकर सरांचे मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा



**लेखकाचे नाव : डॉ विजयकुमार कुमठेकर**
**प्रकाशक : वैजनाथ वाघमारे**
**प्रकाशक : शब्दवेध बुक हाऊस, संभाजीनगर**
**मुखपृष्ठ : संतोष धोंगडे, पुणे**
**प्रथमावृती : 1 ऑगष्ट 2025 (डॉ आण्णा भाऊ साठे जयंती)**
**स्वागतमुल्य:- 100 रुपये**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**


जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103